जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०१.०८.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक दलाल महिला आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक ३१/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गोरडे यांना माहिती मिळाली की, ''कॅम्पस कॉर्नर बिल्डींग समोर, फुटपाथवर, शहाड स्टेशन रोड, कल्याण '' या ठिकाणी एक महिला दलाल ०१ असहाय्य महिलेस फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे. सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सापळा लावून एक दलाल महिलेस ताब्यात घेवुन तिच्या रखवालीत असलेल्या ०१ पिडीत महिलेची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत महिला दलाल आरोपीविरुध्द खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नंबर । ६३३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३ (१) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी महिलेस अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/वैशाली गोरडे, मपोउपनि/स्नेहल शिंदे, श्रेपोउपनि/क्षिरसागर, सपोउपनि/डी.के. वालगुडे, पोहवा/के.बी.पाटील, आर.यु.सुवारे, मपोअमं/पी.जी.खरात,एच.आर.थोरात, चापोशि/एस. सी.पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर